आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२५ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राज्यात आजही मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल, देवेंद्र फडणवीस, राहुल नार्वेकर, उदय सामंत, बाळा नांदगावकर यांच्यासह अनेकांनी भरले अर्ज

- महायुतीमध्ये २७७ जागांवर एकमत, उर्वरित जागांवर दोन दिवसांत निर्णय होणार असल्याची भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

- महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागा लढवणार, उर्वरित जागा मित्रपक्षांना दिल्याचं बाळासाहेब थोरात यांचं स्पष्टीकरण

**आणि**

- राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसेकडून उमेदवार यादी जाहीर

**<><><><><>**

राज्यात आज दुसऱ्या दिवशीही उमेदवारी अर्ज भरायला उमेदवारांची गर्दी दिसून आली.

उपमुख्यमंत्री **देवेंद्र फडणवीस** यांनी **दक्षिण पश्चिम नागपूर विधानसभा** मतदारसंघासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. त्याआधी त्यांनी संविधान चौक ते आकाशवाणी चौक रॅली काढली, तसंच त्यानंतर झालेल्या सभेला संबोधित केलं आणि पुन्हा सत्तेत येऊ असा विश्वास व्यक्त केला.

**शिवसेना** नेते आणि मंत्री **उदय सामंत** यांनी **रत्नागिरी विधानसभा** मतदारसंघातून, **आशिष शेलार** यांनी **वांद्रे पश्चिम** मतदारसंघातून तर **शिवसेनेचे** नेते **प्रताप सरनाईक** यांनी **ओवळा माजीवडा** मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

विधानसभा अध्यक्ष आणि भाजपा नेते **राहुल नार्वेकर** यांनी **कुलाबा** मतदारसंघातून अर्ज भरला.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार बाळा नांदगावकर** यांनी आज **शिवडी विधानसभा** मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित होते.

**कर्जत जामखेड** मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राम शिंदे, कोपरगाव विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आशुतोष काळे, शिर्डीमधून डॉक्टर राजेंद्र पिपाडा यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. श्रीरामपूरमधून संतोष भाऊसाहेब कांबळे, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार मेघा डोंगरे यांनी वाशिम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरला. अकोला पूर्वमधून भाजपचे उमेदवार रणधीर सावरकर, बदनापूरमधून महाविकास आघाडीकडून आज बबलू चौधरी यांनी तर भोकरदनमधून शरद पवारांनी उमेदवारी दिलेल्या चंद्रकांत दानवे यांनी आज नामांकन अर्ज दाखल केला.

**उस्मानाबाद** विधानसभा मतदारसंघात काँग्रेस, शिवसेना, बहुजन समाज पक्षाकडून प्रत्येकी १ आणि २ अपक्ष असे एकूण पाच अर्ज दाखल झाले आहेत. परंडा विधानसभा मतदारसंघात ३ अपक्ष उमेदवारांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राहुल मोटे यांनी अर्ज भरला. उमरगा विधानसभा मतदारसंघात १८ तर तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ५० अर्ज आज खरेदी केले गेले परंतु दोन्ही मतदारसंघात आज एकही अर्ज दाखल झाला नाही.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आज सावंतवाडीतून तिकीट नाकारलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अर्चना घारे-परब यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन तेली यांनी आपला

उमेदवारी अर्ज सावंतवाडीतून दाखल केला. दरम्यान हा अर्ज डमी असून अधिकृतरीत्या २९ तारखेला सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राजन तेली उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचं त्यांच्या पक्षाचे सावंतवाडी संपर्कप्रमुख रुपेश राऊळ यांनी सांगितलं. यवतमाळच्या वणी मधून मनसे नेते राजु उंबरकर, नवी मुंबईतल्या ऐरोली विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या अंकुश कदम यांनी तर इंदापूर मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्तात्रय भरणे यांनी आज नामांकन अर्ज जमा केला.

**गडचिरोली** जिल्ह्यात आरमोरी विधानसभा क्षेत्रात रामदास मसराम तर गडचिरोली मतदारसंघातून डॉ. देवराव होळी यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केलं. अहेरी मतदारसंघात आज एकही अर्ज दाखल करण्यात आला नाही. आतापर्यंत जिल्ह्यात १८६ अर्ज खरेदी केले गेले आहेत.

**<><><><><>**

महायुतीमध्ये २७७ जागांवर एकमत झालं असून उर्वरित जागांवर दोन दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली. भाजपाची दुसरी आणि तिसरी यादी केंद्रीय निवडणूक समितीच्या मंजुरीनंतर जाहीर होईल. तोपर्यंत इच्छुकांनी अर्ज भरू नये, असं त्यांनी भाजपा कार्यकर्त्यांना बजावलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राज्यात सुमारे १३ ठिकाणी सभा होणार आहेत. सध्या मुंबई, नवी मुंबई, गोंदिया, अकोला, नांदेड आणि धुळे ही ठिकाणं निश्चित झाली आहेत. उर्वरित लवकरच होतील, असं त्यांनी सांगितलं. नवाब मलिक यांच्या बाबतचा निर्णय अजित पवार घेतील. आमदार रवी राणा त्यांच्याच युवा स्वाभिमानी पक्षात राहणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर

जोरगेवार भाजपाच्या संपर्कात आहेत. सुधीर मुनगंटीवार हे त्यांच्याशी समन्वय साधून चर्चेतून योग्य निर्णय घेतील, असं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं.

आर्णी विधानसभा मतदासंघातले माजी आमदार राजू तोडसाम, मूर्तीजापूर विधानसभा क्षेत्रातले नेते रवी राठी यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. येत्या काळात मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश होतील असा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी ९० जागा लढवणार आहेत. उरलेल्या १८ जागा मित्र पक्षांना दिल्या जातील, अशी माहिती काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी आज दिली.

राज्यात विधानसभा निवडणूक हरण्याच्या भीतीने भारतीय जनता पक्ष अफवा पसरवत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना म्हणाले. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या एका विधानाची मोडतोड करून या अफवा पसरवण्याचा भाजपाचा प्रयत्न महाराष्ट्रात चालणार नाही, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं आज दुसरी यादी जाहीर केली. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याची घोषणा केली. यात अणुशक्तीनगर इथून नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक, इस्लामपूरमधून निशिकांत पाटील, तासगाव - कवठे महांकाळ मधून संजय पाटील, वडगाव शेरी इथून सुनील टिंगरे, शिरूर इथून ज्ञानेश्वर कटके यांना

उमेदवारी देण्य़ात आली आहे. दरम्यान, काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी आणि भाजपाचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षानं चिखलीकर यांना लोहा मतदारसंघातून तर सिद्दिकी यांना वांद्रे पूर्व इथून उमेदवारी जाहीर केली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं पाच उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. यात कसबा पेठेतून गणेश भोकरे, चिखलीतून गणेश बरबडे, कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून अभिजीत राऊत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. याशिवाय केजमधून रमेश गालफाडे आणि कलीना इथून संदीप हुटगी निवडणुकीच्या रिंगणात असतील.

**<><><><><>**

भाजपातून राजीनामा दिलेल्या आणि काँग्रेसमध्ये प्रवेश न केलेल्या राजेंद्र गावितांना शहाद्यातून काँग्रेसने तिकीट जाहीर केल्याने नंदुरबारमधल्या  कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे. राजेंद्र गावितांच्या उमेदवारी विरोधात काँग्रेसच्या पाच इच्छुकांनी आज पत्रकार परिषद घेतली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आज नाकाबंदी दरम्यान आज सहकार नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत 138 कोटीं रुपयांचं सोन पकडण्यात आलं होतं. सिक्वेल सिक्युअर कंपनीच्या गाडीत हे सोनं जप्त झालं. ही कंपनी सोन्या चांदीचे दागिने, आणि मौल्यवान वस्तूंची वाहतूक करते. ही गाडी नेहमीप्रमाणे

या वस्तूंची वाहतूक करत होती हे स्पष्ट झालं असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

हिंगोलीतल्या बसस्थानक परिसरात आज स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन वाहनांमधून १ कोटी ४० लाख रूपयांची रोख रक्कम जप्त केली. वाहनांत रोख रक्कम सापडल्याची माहिती मिळताच निवडणूक विभागाचे पथकही तिथं  दाखल झालं.

<><><><><>

निवडणुकीदरम्यान जप्त केलेली रोख रक्कम मुक्त करण्यासाठी  त्रिसदस्यीय समितीकडून पद्धत निश्चित करण्यात आली आहे. या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, निवडणूक खर्च संनियंत्रण अधिकारी आणि जिल्हा कोषागार अधिकारी यांचा समावेश आहे. सदर जप्तीविरोधात एफआयआर दाखल नसेल किंवा ही रक्कम निवडणूक प्रचार, उमेदवार, पक्ष आदीशी संबंधित नसेल तर ही रक्कम परत करण्यात येणार  आहे. जर रक्कम १० लाखांच्या वर असेल तर प्राप्तीकर विभागाला कळविण्यात येणार आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **मुंबई पूर्व उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

//<><><><><>//